# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.०६/०५/२०२१

**<u>प्रेसनोट</u>**

वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोरोना विषाणूचा (कोविड-१९) वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन महानगरपालिकेमार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. राज्यात रुग्णांवर उपचार करतेवेळी ऑक्सिजनचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी शासनाकडून विविध सूचना करण्यात आल्या आहेत.

त्या अनुषंगाने मा.आयुक्त श्री.गंगाथरन डी. यांच्या अध्यक्षतेखाली व मा.अति.आयुक्त श्री.संतोष देहेरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील खाजगी रुग्णालयांच्या व्यवस्थापकाची झूम मिटिंग दि.०५ मे, २०२१ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर मिटिंगमध्ये खाजगी रुग्णालयांत ऑक्सिजनची योग्य व आपत्कालीन सुविधा उपलब्ध असणे, तसेच रुग्णालयानी पर्यायी ऑक्सिजन सिलिंडर उपलब्ध करून ठेवणे, ५० बेडपेक्षा कमी बेडसंख्या असलेल्या रुग्णालयांनी ऑक्सिजन कॉन्सट्रेटर खरेदी करणे, तसेच ५० बेडपेक्षा जास्त बेड संख्या असणाऱ्या खाजगी रुग्णालयांनी रुग्णालयाचा स्वत:चा ऑक्सिजन जनरेशन प्लांट सुरु करणे इ.बाबतच्या सूचना खाजगी रुग्णालय व्यवस्थापकांना देण्यात आल्या. त्याचप्रमाणे खाजगी रुग्णालयांतील ऑक्सिजन ऑडीट, इलेक्ट्रिक ऑडीट, फायर ऑडीट, स्ट्रक्चरल ऑडीट इ. वेळच्या वेळी करून घेणे, तसेच आपत्कालीन परिस्थितीत लागणारी सर्व यंत्रणा सुसज्ज ठेवणेच्या सूचनाही मा.आयुक्त व अति.आयुक्त यांच्यामार्फत खाजगी रुग्णालय व्यवस्थापकांना देण्यात आल्या.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**